डॉ. नितीन मोरे

# न.बा.च्या( प्रेम )कविता



# न.बा.च्या (प्रेम) कविता

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# न.बा.च्या (प्रेम) कविता

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

न.बा.च्या (प्रेम) कविता

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ ऑक्टोबर २०१९{दिवाळी पाडवा}

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची ईसाहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. श्रिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी (एकांकिका )
16. वाळूतल्या रेघा
17. संधी साधू (नाटक )
18. न.बा.च्या (प्रेम) कविता

ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर

विनामूल्य उपलब्ध आहेत.

www.esahity.com

# डॉ. नितीन मोरे

नाटके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ragdarabari_nitinmore.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sangato_aika_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramadityacha_darbar__nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chakramaditya_2_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prematuranam_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ya_kolhatakaranchya_gharat_nitin_more.pdf

विनोदी साहित्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/adhunik_kahanya_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/valutil_regha_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bhrashtachar_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/machchhar_times_nitin_more.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/nach_jamure_nach_nitin_more.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/aham_brahmasmi_nitin_more.pdf



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kelyane_shirshasan_nitin_more.pdf


राग दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
अहम् ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेघा

डॉ. नितीन मोरे
संधी साधू


डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार



डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# अर्पणपत्रिका

सर्व नवरा बायकोंना

सादर अर्पण

## न-बा च्या (प्रेम) कविता!

कुणीतरी कधीतरी म्हणून ठेवलेय.. लग्न हा एखाद्या प्रेमकथेचा सुखांत! म्हणजे सुखाचा अंत! नवलाईचे नऊ दिवस संपवायला कुणी काही दिवस घेतात तर कुणी काही वर्षे. नि मग सुरू होते ते संसार नामक गाड्याचे ओढणे. कुणी नवरा बायकोला त्या संसाररूपी बैलगाडीची किंवा अगदीच उदार असला तर संसार रथाची दोन चाके म्हणतात. आधीचा नवथर प्रेमालाप संपला की उरतात काही संवाद. त्यातूनही खरेतर प्रेमाचे शब्द संपले असतात असे नाही. फक्त त्यांचे स्वरूप बदलते. एकमेकांच्य पाठचे प्रेम कायम राहिले तरी त्याची भाषा बदलते. हिंदीत त्याला नोंकझोंक म्हणतात त्या प्रकाराची.

ह्या संग्रहात अशाच नवरा बायकोच्या प्रेमाच्या कविता आहेत. सूर विनोदाचा असला तरी त्याच्या मागच्या प्रेमाच्या भावना सुटू नयेत! या संग्रहात अशा बत्तीस कविता आहेत. 'छ'त्तीस नाही मुद्दाम .. कितीही तू तू मैं मैं केले दोघांनी तरी दोघांत छत्तीसचा थोडीच असतो. त्यामुळे बत्तीसावरच थांबणे इष्ट! असो.

ई साहित्य वर हा माझा पहिलाच कविता संग्रह. यांना वात्रटिका म्हणता येणार नाही पण वात्रटपणा मात्र आहे भरपूर! वात्रटिका म्हणा किंवा नका.. पण त्यातल्या वात्रटपणावर टीका मात्र जरूर होऊ शकते!

डॉ. नितीन मोरे

## अनुक्रम

१. नवी गझल

२. काय बाई सांगू

३. हिच्या हाताची सर..

४. हे.. एक ध्यान

५. तुला पाहते रे

६. बाराच्या भावात

७. तेव्हा आणि आता (१)

८. उखाण्यांची कविता

९. अहो.. ऐकलंत का

१०. भांडण

११. बेंडबाजा

१२. भविष्य

१३. तेव्हा आणि आता (२)

१४. प्रेमवीर

१५. कविराजांची कविता

१६. तेव्हा आणि आता (३)

१७. घरोघरी (१)

१८. घरोघरी (२)

१९. मी आणि हे

२०. तेव्हा आणि आता (४)

२१. एका उशीराची कविता

२२. तेव्हा आणि आता (५)

२३. विसराळू इतुके

२४. डॉक्टरीणबाईंची कविता

२५. भार्या चतुर्दशी

२६. पती चवदसा

२७. कसं काय पावनं

२८. पतिधर्माची कविता

२९. मी होते म्हणून

३०. ह्योच नवरा ..?

३१. आठवते ना तुला?

३२. सु सं स्तोत्र!

१

## *नवी गझल*

गाठ आहे माझ्याशी सोडून कुठे पळशील तू
लगाम आहे माझ्या हाती सांग कुठे जाशील तू

कैद न केले मी तुला घालूनी ते गळयात हात
जरुरी आहे कशाला लोचनांनीच जी घडे बात

म्हणती डोळे जुल्मी गडे नयनांनीच मी केली बात
सावध मी आहे परंतु तुझे हास्य न करो माझाच घात

लबाड असला आहेस तू हसवूनी भुलविशी मला
त्या हास्यात अडकुनिया हसहसत फसविशी मला

म्हणून सदासदैव राहते सावध हरिणी मी अशी
सापडेन सापळयात अन पडेन न मी फशी

हाय मी काय केले कर्माची पूर्वजन्मी असे
लाभलास याच जन्मी लावण्या मजला पिसे

म्हणून दाखवीत फिरते अशी मी तुला माझाच इंगा
अन् लपवते मन्मन जे घाली हाय तुजभवतीच पिंगा

घेऊनी लगाम हाती साजरा करीते बैल पोळा
ठाऊक असूनी मजला तू न इतकाही सांब भोळा

२

***काय बाई सांगू***

काय सांगू बाई
एकेक याची तऱ्हा
ऐकेल तर शपथ
तोरा पहा जरा

घडले काही जरी
मी सांगितलेलेच आधी
गोष्ट सोपीशी पण
कळत नाही याला साधी

समजतो जसा मोर स्वतः ला
डोक्यावर मारे जसा तुरा
पान हलेना माझ्या विना
पण मिरवतो किती तोरा

भांडभांड भांडून मनवतो
समजे स्वतःस शहाणा
पण नाही भुलणार मी
हे सत्य सोळा आणा

एक गुपित माझे आहे
फक्त कानात सांगू बाई
त्याच्यावाचून करमेना
पण त्याला सांगायचं नाही

सांगितलं की हे नवरे लोक
बसतात डोक्यावर चढून
आपलं आपलं गुपित राहिल
मनाच्या कोपऱ्यात पडून

पण जाऊ देत...

जा दिले तुला अभय मी
करू नको वल्गना
ऐकावे गडे माझे
ही जन्म भरची साधना

३

## *हिच्या हाताची सर...*

हिच्या हाताची सर
कशाला नाही
म्हणून पहा एकदा
असे काहीही नाही!

हिंमत असेल तर
टेकवा जीभ नाकाला
शामत आली असेल
जावे इतके टोकाला

खरे आहे अन् असेल
म्हणून म्हणायचे
तिच्या हातचेच आणि
चाटूनपुसून खायचे

आहे साऱ्यांनाच ठाऊकी
तीच आहे असली शान
माहिती आहे तिच्या वाचून
हालत नाही इथे पान

म्हणून काय तिची
फिरकी नाही ताणू
आहे ठाऊक व्यापून
ती अणू अन् रेणू

भारी आहे इंग्रजी तिच्यात
म्हणता तिला बेटर हाफ
आहे झाले मिसनॉमर
आहे तीच बेस्ट हाफ

तरी गम्मत खरी आहे
चेष्टाच तिची करण्यात
तिच्या हाताला सर
कशाचीच नाही हे सांगण्यात

सगळे आहे मान्य तरी
म्हणूनच तिला चिडवावे
रुसली म्हणजे मग
हळूच तिला मनवावे

बाब आहे बरी
गंमत आहे रुसण्यात
गोष्ट मात्र खरी
रूसण्यानंतर हसण्यात!

४

## *हे.. एक ध्यान*



आमचे हे म्हणजे
एक आहेत ध्यान
फटकळ इतके जशी
तलवारी शिवाय म्यान

ध्यान आहेत पण छान आहेत
बोलावे लागते असे
कशी कशी सांगू कुणा
काय काय सांगू कसे

कचेरीत जायला निघतात
जातात विसरून रूमाल
आणतात येताना शंभर डझन
उचलून आणतो हमाल

चश्मा विसरणे तर
आहे यांचा मुळी छंद
चाचपडत फिरतात
मग डोळे जणू बंद

घालतात मोजा पायात
एकात निळा न एकात लाल
त्यांची ही म्हणे एक शान असते
पण चुकचुकते बघून पाल!

असे हवे नि तस्सेच हवे
हे दे ते दे असे कर नि तसे
सोडतात ऑर्डर लेफ्टराईट
वाटत नाही काही कसे

येता जाता मग
देत राहतात मला आवाज
वैतागते मी इतकी
नाही येणार कुणा अंदाज

आळस असा कसा बाई
हवे ह्यांच्या हातात सारे
उद्या म्हणतील मालूबाई
वाहवा खारे न् मतलई वारे

आधी नव्हते असे काही
किती बदलले बाई
गाडी जाते सुटून अन् नंतर
उगाच करतात घाई

बाहेरून नाही येणार अंदाज
पण आतून आहेत छान
आहेत तसे चांगले सांगते
कुणी खुशाल म्हणा ध्यान

५

## *तुला पाहते रे ...*

तुला पाहते रे
या चष्म्यातून जाड्या
पाहून पाहून थकले
अरे तुला गड्या

उघडून डोळे नीट
पाहते तुज घोड्या
चश्मा माझा जाडा तुझ्या
हातपायाच्या काड्या

असली नाव तुझे गुणवंत
म्हणते तुज गोड्या
पाण्यामध्ये सोडित होते
तुज नावाने होड्या

आठवतात ते दिवस
गोड बोलायचा तू गोड्या
तुजसाठी उचापती
केल्या का मी थोड्या



आठवते करायचास
तू मर्कटासम खोड्या
आठवतं का सगळे
की विसरलास थोड्या

का नि कशी झाले इम्प्रेस
मी सोडविते कोड्या
त्या तिकडे वरती
म्हणे जुळतात जोड्या!

६

## ***<u>बाराच्या भावात..!</u>***

पाहिले तुला मी तिथे कॉलेजात
काही तरी हलले लक्कन काळजात
पडलो मी असा तुझिया प्रेमात
अन्
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात

कुणा कसे ठावे भविष्य बिविष्य
ऐकताच दंग तुझे ते इश्श इश्श
कल्पना नसते काय वाढले नशिबात
अन्
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात

म्हणती सगळे तेव्हा ते मला प्रेमवीर
माहिती नव्हते म्हणून नच सुटला धीर
कळते सगळे जे घडण्या पश्चात
अन्
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात

तशी तूच होतीस - आहेस माझीच राणी
नाक्यावरच्या म्याकसमोर जसे हॉटेल इराणी

पिझ्झाबर्गरसमोरही मन रमे बनमस्क्यात
अन्
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात

कुणी सांगावे काय काय होईल उद्या नि परवा
तुझे मानावे हुकूम हाच उपाय बरवा
मन माझे रूंजी घाले तुझ्या अंगणात
अन्
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात

तशी आहेस तू सुगरण आणिक प्रेमळ
तुझ्यामुळेच घराला घरपणाचा दरवळ
अन्
म्हणती मित्र सारे वहिनी असता घरात
तु का म्हणतो गेलास बाराच्या भावात?

कसे सांगू त्याला ही कैद मी मागून घेतली
माझ्या आजूबाजूस मीच कुंपणे घातली
माझा कदमताल चाले हिच्या आदेशात
अन् म्हणून
तुका म्हणे गेलो बाराच्या भावात!

७

<u>*तेव्हा आणि आता...*</u> ( १ )

माझिया जातीची मिळे मज कुणी
आवडलो तेव्हा .. आता काढे उणीदुणी

दिवस होते हौस मौज आणि नव्या नवलाईचे
तुला मी सुपर की स्पायडर मॅन वाटायाचे

होतोच मी ही तेव्हा तसा वेडा तुझ्यासाठी
धावायचो जणू म्यारेथॉन तसा तुझ्यापाठी

आणायचो रोज रोज अबोली मोगरा गजरा
रोखायचीस प्रेमळ तू मजवरती नजरा

किती किती रे राजा तू, माझाच रे जानू
म्हणायचो तुझ्यासाठी का न चंद्र तोडून आणू

मोठ्या कौतुकाने पहायचीस, तू भरूनिया डोळा
वाटायचे माझे मला, तू पार्वती अन् मी सांबभोळा

माझ्यासाठी जणू तू केले होतेस तेव्हा तप
आता म्हणतेस कशी मी तुझ्या डोक्यासच ताप

तेव्हाचे दिवस नवे, ते तेव्हाच उलटले
कसे काय न समजले अगदीच पालटले

तुझ्यासाठी मीच होतो तेव्हा सुपरहीरो
आता म्हणतेस अशी, मला वाटे मीच झीरो

तूही तीच मीही तोच, तोच चंद्र ही नभात
बदलल्या नजराच बदलत्या मनमनात

असे झाले खरे राणी, राजा झाला गं गुलाम
स्वैर सिंहाला घातला असला गं तू लगाम

बदलले काही सारे, काही तसेच राहिले
बंद डोळयांच्या आडून कुणी कसे ते पाहिले

असे नव्हे की हे असे होई, कुणा नव्हते माहिती
खाता लगीनाचा लाडू, तेव्हा नसे कसली क्षिती

दिन तेच रात्र तीच .. पण गेले नवेपण नवनवे
असे असले तरीही वाटे सारे का हवेहवे

एकदाच जुळल्या तुझ्या माझ्या की त्या तारा
आता तुटो शेंडी की पारंबी खेळ खेळूयाच सारा

८

## ***उखाण्यांची कविता!***

काय बाई कशी सांगू मलाच बाई वाटे लाज
रामरावांचे लक्षण काही ठीक नाही दिसतं आज

मला नका लाऊ उगा अशी लाडीगोडी
रामराव काढता बघा उगा माझी खोडी

रामराव राम माझे मीच त्यांची सीता
नाही भेटला पण कुणी मला हनुमंता

वाट मी पाहते जिथे सागरा मिळते धरणी
रामराव ते शिकारी अन् मी घायाळ हरणी

बाई बाई फुलला कसा पिसारा असा मनमोराचा
रामराव आले वाटते, करकर आवाज आला चपलेचा

पाहायाचे मी रामरावांना तेव्हा अगदी डोळे भरून
गेले ते दिन आता, पाहवे लागते डोळे मोठे करून

लग्नाआधी वाटले होते आहेत किती बडे
रामरावांच्या नावाने आता रोज फोडते खडे

रामराव काढत असतात येताजाता माझी अक्कल
तरी बरे उघडा पडलाय मेंदू, पडून सगळे टक्कल

अस्सा संसार सुरेख बाई पडलेय त्यात अडकून
रामरावांचा येतो राग मला येताजाता सडकून

उगा म्हणू नका बाई मी काढते उणेदुणे
लाजतच घेते बाई ह्यांच्या नावाचे हे उखाणे



९

## *अहो.. ऐकलंत का?*

अहो
ऐकलंत का?
केव्हापासून ओरडतेय
ऐकताय का?

मी काय म्हणते..
ऐकताय की नाही?
हल्ली लक्षच नसतं तुमचं..
खरेय की नाही?
कशात तरी घालून बसता डोके..
कळत का मला नाही?

येता जाता
तो मेला पेपर घेऊन बसा
चिडवायचा मला
घेतलायत तुम्ही वसा
फोडून ओरडते मी घसा
नि मग म्हणता ..
मी बोलते व्हसाव्हसा

जाऊ दे झाले
होऊ दे तुमच्या मनासारखं
मला मेलीला काय
मला व्हायचंच पारखं

माझं काय व्हायचेय
कुण्णी म्हणून ऐकत नाही
देवा रे माझे काय
बोलायला मला कुणी नाही

जाऊ द्या नका ऐकू
मीच बसते कशी गप्प
बघतेय कसे घर नाही
होत माझ्याशिवाय ठप्प

तुम्हाला म्हटले म्हणून
गुजगोष्टी मनीच्या सांगू चार
पण माझे ऐकतेय कोण
तुम्ही बिझी नाही का फार

मलाच मेलीला
नाही काही काम
तुम्हीच दमता रोज
मी करते ना घरी आराम

ऐका ना ...

घेऊन या दोन जुड्या पालक
एक किलो कोबी..
कपडे घेऊन या माहितीय ना
कोपऱ्यावरचा धोबी..

विसराल की
ठेवाल लक्षात?
की चिठ्ठीच देऊ
लिहून खिशात?

पण मला माहितीय
चिठ्ठी आहे हेच विसराल
चार गोष्टी सांगितल्या
त्यातल्या दोन विसराल

काहीच नाहीतर म्हणाल
अगं चश्माच विसरलो
नाहीतर उगाच सांगाल
केळीच्या सालावरून घसरलो

माझे काय मेलीचे
येते मला दया
उगाच म्हणून करता

तुम्ही गयावया

आज मात्र नाही
करणार तुमची गय
बिघडवा हवी तितकी
माझी तुम्ही लय

ऑफिसातले काम
ठेवता ना ध्यानात बरे
माझेच चुकते मेलीचे
आहे तुमचेच ते खरे

मी सोडणार नाही संधी
आज अशी रागवायची
आज मुळ्ळी रूसवा
मी नाही सोडायची

तुम्ही म्हणणार आता
जाऊ देत रागरूसवा
तुमच्या बोलण्याचा
अर्थ मला ठाऊकै फसवा

आता मी अशी
फसायची नाही
रूसवा माझा

सोडायची नाही

याल मग हळूच
लाडीगोडी लावायला
मागच्या वेळेसारखे
हळूच फसवायला

माझा रूसवा मी
मुळ्ळी सोडायची नाय
मागच्या वेळेसारखी

मुळ्ळी फसायची नाय

अहो..
ऐकताय ना हो..
नाही म्हणजे
मी एकटीच ना बोलतेय
लक्ष कुठेय तुमचे
जाऊ दे..
उगाच म्हणाल..
ओरडतेय!



१०

## ***भांडण!***

काय होई सांगू जाता माझ्या मनातले
अन् काही सांगू जातो तुला मी बरे
वाद नाही गं तुला माझे नुस्तेच सांगणे
तू म्हणतेस तुझेच शब्द अंतिम नि खरे

मान्यच करावे लागते ना मला
नाही, ठाऊक आहे मला ते ना खरे
बोलून तुझ्याशी चित्त हलके होई
म्हणून सांगण्याचा यत्न मन माझे करे

पण ऐकून घेशील असली तू नाही
करशी म्हणते तू हेका माझाच खरे
मज न कळते कसला माझा हेका
जेव्हा बोललोच नाही काहीच मी बरे?

करतो बोलण्याचा दुबळा प्रयत्न
तरीही म्हणतो मी तुझेच ग खरे
तरीही का न घेशी शब्द दोन ते ऐकून
माझेच ग तारू कसेबसेच ते तरे

सांगसांगून तुला इतके कळले
माझ्या काठीला न आवाज हे खरे
मान्य आहेच मला तुझा शब्द अंतिम
शेवटी चूक माझीच हे मान्य मज बरे

हरण्याची तुलाच असली का हौस
फुकाच का गड्या घालतोस वाद
असतील माहिती संसाराचे नियम
मग रे असले सोडून दे नाद

तू जाशी न ऐकताच निघूनी तरातरा
संवादाचा प्रयत्न .. मीच गोरामोरा
तुझ्याशी बोलून कळले जरा
आपुलाच वाद आपणाशी बरा!



११

## ***बेंडबाजा!***

तूच माझी राणी
म्हणून न सांगतो कुणाला ..
न म्हटल्यास येईल ना..
आणीबाणी!

मग पेटेल एक वणवा
किंवा
शाळेतल्या सारखा
उभा करशील
मला ओणवा..

किंवा घडवून आणशील प्रलय
नुसत्या डोळयांतल्या धारांनी
आणि डोळे दीपतील माझे
माझ्याच
अकलेच्या तुटलेल्या तार्‍यांनी

होईल कदाचित
उद्रेक तुझ्यासारख्या
सूर्यमुखीच्या
ज्वालामुखीचा ..

आणि वाटेल मला त्याहून
सोपे आहे
तोफेतोंडी जाणे
किंवा
कदाचित चावून खाणे
लोखंडाचे चणे..

म्हणून म्हणतो गं..
आणून डोळा पाणी..
तूच..
तूच माझी राणी
तूच ग माझी राणी..

फक्त गडे
एकच पडतो प्रश्न
बघ आहे का उत्तर..
एकच आहे गं
नाहीत प्रश्न सत्तर

राज्ञी असते एका सम्राटाची ना?

अन्

राणी तर असते राजाची ना?

तर ..

तू राणी तर मी राजा

मग होईल माझा गाजावाजा

तू सम्राज्ञी तर मी सम्राट..

बघतच रहा आमचा थाटमाट..

प्रश्न इतकाच ग राणी ..

विचारतो.. थांब पिऊन

घोटभर पाणी..

तू असशील जर राणी

तर मी आहेच की राजा..

मग असा गुलामासारखा

का वाजतोय

माझा बेंडबाजा?



१२

## ***भविष्य!***

पाहता प्रथम तुज
हलले काळजात काही
त्या तुझ्या लोचनात
मी भविष्य माझेच पाही

एकदाच पाहिले तू
नजर तुझी प्रेमभरी
लिहिली गेली प्रेमकथा
मज नकळत दर्दभरी

होते बंद डोळयांत माझ्या
भविष्य ते माझे असे
का सांगावे कुणाला
जे मनी माझ्या वसे

समजत होतो मी कुणी
ज्योतिषी ही स्वतःला
दाखवित बंद डोळयांत
स्वप्ने मी माझी स्वतःला

कळते आज मला
का ज्योतिष हे नाहीच शास्त्र
चालविताना पाहूनी तू आज
तव जिव्हेचे धारदार अस्त्र

आज बंद डोळे उघडले
इतकेच त्यांना माहिती
पाठलाग करिती अता
आज्ञा तुझ्या मज मागुती

का परि मज वाटते
आज्ञेत तुझियाच राहणे
बांधूनी झापडे स्वतःहून
इकडे न तिकडे पाहणे


म्हणती ताकद प्रेमाची
हीच का ती गडे ?
इशारा नजरेचा म्हणती
हाच का तो गडे?

दिसते आता मला भविष्य
न ज्योतिष पाहता
का हवा तो ज्योतिषी
तुजला असा मी साहता!

१३

***तेव्हा ..***

***आणि आता!*** (२)



१

तो:

आठवेन हे दिन कधी नंतर
दाटूनी येईल तरीही कंठ
हाय मी बुडलो असा
प्रेमात तुझ्या हा आकंठ..

आता..
तुला पाहुनी वाटे मला मी
हलाहल पचविलेला नीलकंठ

ती:

दिवस असती हे असे
मी आतुर अन् उत्कंठ
ऐकता वाणी तुझी
छातीत धडधड न् मी क्षीणकंठ..

आता..
आज बोलले तुझ्याशी की
चहा लागतो घालूनी सुंठ

२

तो:

स्वप्नातूनही दिसतो सखी
चेहरा तुझाच लाजरा
हर एक क्षण तुझ्यासवे
करतो उत्सवासम साजरा

आता..

काय चुकले माझे आता
सांगूनिया तरी जा जरा

ती:

आज आणणार राजा
मजसाठीच बटमोगरा
पाहते रे स्वप्न मी ही
संसार माझा गोजिरा ..

आता..

पाय पसरूनी लोळतोस
भरूनी अपुला तोबरा

३

तो:

माहिती आहे मला
हीरो आहेच गं तुझा मी
वट आहेच माझीही असली
आहे असा मी असामी ..

आता..

काळ बदलला वेळ ही

राज्य तुझेच, मी करितो गुलामी

ती:

संकेत असला मीलनाचा

राजाच तू अन् राणी मी

दिव्य आपल्या प्रेमाची

बघेलच जग जणू सुनामी

आता..

का इतका तू बदललास रे

कसल्याच ना येतोस कामी?

४

तो:

ज्या गल्लीत न घर तुझे

गल्लीत त्या वळणार नाही

भुंकले कुत्रे अंगावर तुझे

मी तरी पळणार नाही ..

आता:

जीव प्यारा मज सखी

मी असा बधणार नाही!

ती:

तू सखा जिवलगा असा
ते तुझे तुला कळणार नाही
वाट पाहते सदा तुझीच रे
रात्र ही सरणार नाही

ती:
वर्षांत इतका ओळखतो कुत्रा काळा
तो ही ढुंकूनी बघणार नाही!

५
तो:
कुणीही काहीही म्हणा
प्रेमास न जाई तडा
विरघळून जाई असा मी
प्रेमाचा तव पडतसे सडा ..

आता..
खातो रांधलेला भात रोज
दाती कां येई खडा

ती:
केतकीचे फूल तुझे मी
मंद दरवळे केवडा
भेटलासी तू अन् वाटे भरे
माझिया पुण्याचा घडा

आता..

दैव माझे आणि काय..

वाटला होतास असामी मज बडा!

६

तो:

तू किती ठेव अनमोल असशी

कधी सखी तुला कळणार नाही

स्वप्ने तुझी सोनेरी पडती

उघडून डोळे मी बघणार नाही ..

आता..

सोने नव्हे कथील आहे

कळले मला पण वळणार नाही!

ती:

दिवस सोनेरी असे

सांगूनही कळणार नाही

कसला तू आहेस राजा

सांगूनी कुणा पटणार नाही..

आता..

हाय झालास कसा असा

चेक जो वटणार नाही?



१४

## ***प्रेमवीर!***

ठाऊक नसेल तुम्हाला
एकेकाळी मी शूर होतो
लढायचो मी असाही
असला (प्रेम)वीर होतो

नसायची हाती माझ्या
तलवार किंवा ढाल
तरीही होतो लढवय्या
आज असती असले हाल

नाही ठावकी कुणा
कधी कसा बदललो
करूनी म्यान तलवार
पार आता गळपटलो

झाले काय असावे
अंदाज असे का कुणा?
असला जर संसारी तुम्ही
अनुभव नसेलच उणा

आक्रमण केले आणि
जिंकलो प्रेमाची लढाई
जाहलो नकळत चतुर्भुज
मारता मारता बढाई

वाटले की जिंकलोच
होतो असा गुर्मीत मी
वाढले काय सामोरी
होतो असा धुंदीत मी

काय केले प्रथम प्रियेने
नि:शस्त्र असा मी झालो
जिंकले प्रथम प्रेम तियेचे
नि:शब्द पूर्ण मी झालो

केले मग गारद तिने
कळले ना कधी हरलो लढाई
चढविले लोण एक एक
करीत तिने ही चढाई

होतो कसा एकेकाळी
आठवेल का ते कुणा?
आणित उत्साह उसना
करीत होतो त्या वल्गना

आज आहे ठाऊकी
नि:शस्त्र मी नि:शब्द मी
अन् प्रियेच्या प्रेमपाशी
हाय! आहे हतबुद्ध मी!

१५

## *कविराजांची कविता*

वाटले तुला पाहिले तेव्हा
मिटली चिंता जन्मभराची
मिळेल कुणी श्रोता हुकुमी
ऐकवीन चळत तुज कवितांची
करीन कविता मी
खिटपिट करूनी
ऐकशील पापण्या
पिटपिट करूनी
माझ्याकडे बघत राहशील
अनिमिष तुझ्या नेत्रसुमांनी
न्हाऊन निघशील शब्दभ्रमात
माझ्या कोमल शब्द फुलांनी
कृतार्थ होऊन आणि म्हणशील
ऐकत रहावे असे वाटते..
तूच असा शब्द जादूगर
होय.. मला ते ही पटते!
करून चंबू तव गालांचा
म्हणशील,
बोल कविता पुन्हा एकदा
म्हणेन मी ही माझे राणी

तू म्हणशील तर म्हणेन शतदा
कविता 'बोलेन' मी तुजसाठी
ह्रदयही खोलेन तुझ्याच साठी
तृप्त मनाने गाई गाणे
आपसूक ये ओठी तराणे

मग घडले ते सारे मधले
शुभमंगल ते अपुले घडले
माझीच अष्टके मंगल गात
जडले म्हणे जन्माचे नातं
पडती अक्षता डोईवरती
अन्
झालीस म्हणे तू शहाणसुरती!
अशी बदललीस, झालीस शहाणी
आणि बदलली अशी कहाणी

आज आता एकच दिसते
पोरवड्यातच तू मश्गूल असते
आज रातीला निद्रेआधी
उद्याचीच तुज चिंता खाते
तुजला नाही आता सवड
ऐकावयास दोन ही ओळी
म्हणतेस.. कविराज

नकोस भटकू घेऊन झोळी
लिहिणे माझे जणू जड ओझे
झाले संसारासाठी तुझिया
काही बाही तू कारण काढून
पाठी लागसी तूच माझिया
अन्
त्या दिवशी व्हावे असले
का न पडावी डोक्याची शकले
असा कसा केलास तू कहर
आण म्हणे रेशनची साखर!
हाय!
कवी तो कळवळून उठला
ज्याला त्याला सांगत सुटला
प्रतिसृष्टीचा जणू मी ईश्वर
त्यास कशा या चिंता नश्वर
किती तुझी गं ही अनुदारी
त्यास कशास ही दुनियादारी
बदलेल लेखणी सारी दुनिया
फटक्यात कवीची असे ती किमया
ताकद ज्याच्या अशी शब्दात
अडकावे का त्याने दुपट्यात!

काय जाहले आज कळे मज

झाली काही चूकच माझी
जुन्या दिनांतच पडलो अडकून
मन तर नाही अशास राजी
आज जाणवे उभे मनोरे
होते केवळ ते शब्दांचे
बंगलेच ते होते केवळ
कळले नव्हते परि पत्त्यांचे !



१६

*तेव्हा आणि आता..* (३)

**एका कविपत्नीचे मनोगत!**

कवितेच्या जावे गावा, भेटेल तिथे मज रावा
उभा तिथे श्रीहरी तो, मंजूळ वाजवीत पावा

मुरलीच्या मंद स्वरांनी मोहूनी मन गेले माझे
आठविते क्षण प्रेमाचे अजूनही मनात ताजे

होते मी त्यावर आशिक शब्द तयाचे मोहक होते
माझ्याच नशिबावर मी भाळूनी गेले होते

करी काव्य मजवरती तो मी अवखळ तरूणी होते
आठविते ते दिन मी आता, प्रेमात वाहून गेले होते ..

हाय ! आठविते का मी सारे माझीच निवड ही होती
कवितांच्या बाडाची तेव्हा कल्पना मुळी ना होती

उठता बसता हा कवि तर जमवीत बसतो ओळी
महिन्याच्या खर्चासाठी का घेऊन फिरू मी झोळी?

घालून शब्दां का जळते घरी दो वेळेची चूल
पाहिजेत येथे दमड्या, का उपयोगी काव्याचे फूल?

कौतुक करती सगळे, त्यास मिळते वाह वाही
घरी आहे म्हणावे कोणी, त्यांना काव्य पोसत नाही!

मागता मी काही येथे, मिळतात मला का ओळी?
दैवा रे असली का तू, दिली मला रिकामी झोळी!



१७

## *घरोघरी*.. १

अहो चहा म्हणून
बनवता येत नाही हो मला
अगदी तूरडाळ नि चणाडाळीतला
फरकही समजत नाही मला
मेथी कुठली न पालक कुठला
ठाऊकच नाही मला काही
कुठेय रूमाल कुठेय चावी
मी नुसताच शोधत राही
हेही नसते माहिती मला
काय घरात कुठे असते
कोणास ठाऊक ही सगळं
आवरून सवरून कुठे ठेवते
उठलो सकाळी की सगळेच
ही हातात माझ्या ठेवते
घरच्या सगळ्या गोष्टींचा
हिशेब ही तीच ठेवते
उठलो की म्हणतो मी
अगं हे कुठे आहे
घरी आलो की विचारतो
अगं ते कुठे आहे
ती सुद्धा अशी आहे
करीत राहते कामे अशी
थकतेच अगदी शेवटी
सांगते झोपताना वळता कुशी
तरी पण कामे आपली
काढून काढून करतच असते
देवापुढचे दिवे सुद्धा
तीच सदा तेवत ठेवते

माहितीय काहीतरी मदत
केली पाहिजे तिला
खारीएवढा तरी ना वाटा
उचलायला हवा मला
का कुणास ठाऊक पण
सुरूवात मात्र होत नाही
होत नाही, कुणास ठाऊक
की मीच ती करत नाही
ही पण म्हणते

रोज धावपळीने थकता तुम्ही
पडत्या फळाची घेऊन आज्ञा
पाय पसरून लोळतो आम्ही

रोज रोज जाणवते
घराचे तीच घरपण आहे
तिच्यावरती विसंबून
गाडा घरचा धावत आहे
कधी म्हणतो मी
दमली असशील खूप करतेस
तेव्हा आपला घाम पुसत
खुर्चीवरती गप्प बसतेस
ठाऊक आहे कुणी तयार द्यावा
हाती तुझ्या एक कप चहा
किती वाटेल बरे तुला
विचार तर नुसता करून पहा
का कोण जाणे
असले काही मी करत नाही
पेपर वाचत लोळत पडतो
आरामखुर्ची सोडत नाही...



१८

## *घरोघरी* २

काय करावे आता
काही सुचेना बाई
येण्याची झाली वेळ
करते आता घाई

सांगते काय रूबाब
रावांचा माझ्या बाई
क्षण एकही उशीर
चालत त्यांना नाही

हवी हरेक गोष्ट
हातीच अशी ग बाई
मी नसेन तर ह्यांचे
होईल कसे ग बाई

दे रूमाल दे चावी
अॉर्डर सोडत राही
मीच हवी जेथे तेथे
हाताने घेणे नाही

हवे जेवायाला गरमच
तव्यावरूनच ग बाई
करपले काही तरी
कधी खपतच त्यांना नाही

आहेत अस्से की
मी थकूनच जाते बाई
कौतुक त्यांचे पण
सांगता थकतच नाही

कुणी म्हणते किती
लाडावले त्यांना मी बाई
पण नाही तसले काही
माझ्याविन पान हलतच नाही

कधी वाटते थोडी मी
थकून गेले बाई
कुणी यावे मदतीस पण
घरात मुलगी कुणीच नाही

मुलगा एकच दिला
दैवाने मजला बाई
वंशाचा दिवा तो पहा
कसा तळपत राही

मी बघते त्याचे
जेवणखाण अन् सारे काही
त्यालाही कसल्या मुळी
कामाची सवयच नाही

आहे तोही बापासम
यत्किंचित फरकही नाही
लग्नानंतर याचे व्हावे
कसे कळतच नाही

बापाची गोष्टच वेगळी
त्यांना काम सांगू कसे बाई



जात ही असली मुलाची त्यास
बायल्या बनवायचे नाही

येईल सून हाताशी
मी स्वप्नच बघते काही
मुलगीशिवाय बाई
घरास घरपण नाही

कामाचा हा रगाडा
उपसून संपत नाही
उरकून उरकून बाई
मी थकूनच असली जाई

झाली ती इतकी वर्षे
यात बदल कसला नाही
काय सांगू दोघांचे
कौतुकच संपत नाही

१९

## *मी आणि हे!*

ह्यांचे सांगू कसे काय मी
ह्यांचे धोरण एकच असते
लोळत पडूनी गादीवरती
हाती वर्तमानाचे पत्रच असते
घडते जगात कोठेही काही
बित्तंबातमी यांना असते
म्हणे जग जणू यांच्यावरती
सर्वासाठी विसंबून असते
अॉफिसात म्हणे असती बिझी हे
काम जास्त यांनाच असते
ओव्हरटाईम करतील केव्हा
टायमाचीच तर शुद्धच नसते
कुणा सांगावे मी तर काही
यांचे कधीही लक्षच नसते
गंभीर काही सांगू जाता
असली चेष्टा यांना सुचते
सांगू जावे काही मी तर
टुकार विनोदी काही सुचते
तिकडूनी उडुनी कुठुनी कशी
चुकार माशी नाकावर बसते
जगात घडूदे काही पण ते
त्याची चिंता यांना असते
घरात झाला कितीही गोंधळ
तिकडे कणभर लक्षच नसते
माझे बाई धोरण एकच
उगा काही बोलायाचे असते
ऐकत नाहीत म्हणून मध्ये
उगाच रूसवा आणून बसते
जालिम हा उपाय बाई
मध्ये मध्येच मी करीत असते
मग कोठे दिवस काही
यांचे थोडे लक्ष तरी असते
पुढे काय.. काही नाही
पहिले पाढे पंचाव्वन असते
असले असे तरी मी
काही सांगायाचे सोडत नसते
ऐकत नसले तर हुकुमाचे
डोळा पाणी तयार असते

२०

*तेव्हा आणि आता!* ४

**भेट तिची माझी!**

कुणास ठावे मुहूर्त कुठला
उठलो पाहून तोंड कुणाचे
वाटले घडली भेट तिची तर
सार्थक झाले जन्माचे

भेट स्मरते तिची न माझी
होतो घेऊन हाती फूल
पाहता तिला असे वाटले
सर्व जगातील बत्ती गुल

म्हटले तिला तेव्हा हे तर
होती हसली ती लाजून
विरघळले ते ह्रदय माझे
त्या हास्याला पाहून

मग भेटलो अजून आम्ही
भेटत गेलो पुन्हा पुन्हा

आज आठवित बसतो मी
त्या वेडेपणाच्या खाणखुणा

दिवस उडाले असे भुर्रकन
झाले हात दोनाचे चार
आठवती ते दिन अजूनी
दूर नाहीत ते ही फार

सणवाराचे दिवस संपले
नवलाईचेही सरले दिन
हातघाईची सुरू लढाई
वास्तव हे ही दैनंदिन

कुठे कशी कधी पडली
आठवते अजूनी गाठ तिची
मनात दाटे भीती अशीच ती
मज आता त्या ग्रहमानाची !

२१

## *एका उशीराची कविता*

आलो मंद पावलांनी
शिरलो घरात मी गं
हलकेच जाग तुज आली
उघडले डोळे सताड तू गं

झाला गडे उशीर
म्हणूनी वैतागलीस का तू?
पाहून वाट माझी
निद्रा अधीन ना तू?

जेव्हा बॉस देई काम
त्यास करू मी काय
बसतो करीत काम
मी त्यावरी निरुपाय

आलो म्हणून उशीरा
हलकेच मंद पावलांनी
संकेत रुसव्याचा
दिला बंद पापण्यांनी

मी केला इशारा मंद
चालण्याचा पावलांना
तू स्फोट ज्वालामुखीचा
केलास उघडून लोचनांना

त्या उद्रेकात लाव्हा
मी गाडूनियाच गेलो
नाही नवीन मजला
तरीही भांबावून गेलो

करतो सराव आताशा
तुझा राग मजली सात
वाटते न जमेल कधीही
धडकी भरे उरात!

२२

*तेव्हा आणि आता..* ५

**डोळे..**

जुल्मी डोळे तुझे
पाहिलेस रोखून
गोष्ट ती तेव्हाची
पाहतो मी आठवून

तेव्हाचे नेत्र तुझे
किंवा म्हणू नयन त्यांस
चक्षु किंवा अक्ष तेच
म्हणा त्या लोचनांस

होते तेव्हा दोन नेत्र
आणि ते जुल्मी गडे
आता तव डोळयांतून
का बरे अग्नि पडे

आठवते होते टपोरे
सुंदरसे नेत्र दोन
आज मला भासतात
शंकराचे नेत्र तीन

वाटे तेव्हा मी
होतो जणू सांब भोळा
अन् माझा तू गिरिजा
घेतलास तृतीय डोळा

आज पटते मला
भोळा का तो शंकर
वाचव रे तूच मला
हे दयाळू करूणाकर!

२३

## ***विसराळू इतुके..***

यांचे म्हणजे असे आहे
काहीच त्यांना आठवत नाही
घर समजून आपले सांगू
कुठे जातील नेम नाही
रस्ता नाहीत चुकत पण
गल्ली हल्ली चुकू शकतात
आपले समजून कुणाच्या
घरी जाऊन बसू शकतात
जाऊन चक्क मारतात गप्पा
पिऊन चहा परत फिरतात
निघताना येते लक्षात
मग उगाच सॉरी म्हणतात
आणा म्हटलं गोष्टी चार
तर दोन गोष्टी नक्की विसरतात
आल्यावर तू बोललीच नव्हतीस
असे म्हणून उगा घसरतात
असले असे तरी नाहीत विसरत
एकही काम अॉफिसचे बरे
घरामध्येच नसते लक्ष
घरच्या कामासाठी हे नखरे

विसराळू इतुके सांगते
अवघे पन्नाशी वयमान
लग्नाला जातील तर
विसरतील कोण यजमान
प्राध्यापक नवरा नको ग बाई
असले काय कामाचे
विसराळूपणाची हद्द झाली
नावच विसरतात स्वतः चे
नावावरून आठवले
आडनाव काय तर आठवले
क्कायतरीच नाव बाई
आहेत विसूभाऊ विसरले!



२४

## *डॉक्टरीणबाईंची कविता*

कुणी काय म्हणे त्यादिवशी
माझी काय म्हणे मजा आहे..
त्यांना काय ठाऊक
मजा नाही ही सजा आहे..

कारण काय विचारता..
मी आहे एक डॉक्टरीणबाई
औषधबिवषध मागू नका
मी त्यातली मुळीच नाही

डॉक्टरीण आहे म्हणजे
म्हणजे तशी काही नाही
घातली माळ डॉक्टरच्या गळयात
झाले डायरेक्ट डॉक्टरणीबाई

घातली माळ डॉक्टरच्या गळयात
आणि चांगलीच बाई फसले
वेळ नाही डॉक्टरला कधीच
नाही फरक कितीही रूसले

त्या हाराच्या आधीच पडलाय
स्थेथोस्कोप येऊन गळयात
आणि तोच जास्त प्रिय आहे
मीच आहे तळयात मळयात

रोज घरून जाताना
पेशंटचा नुसता विचार
नाही काळवेळ येण्याचा
घरी कधी परत येपणार

आल्यावरही घरीदारी
नुसतेच फोनवर बोलत असतो
'सिस्टर डू धिस ॲंड द्याट' असली
अॉर्डर एकेक एकेक देत सुटतो

आला घरी तरी एक पाय
त्याचा हॉस्पिटलात असतो
रात्री बेरात्री झोपेतून उठून
हॉस्पिटलाची वाट धरतो

जाणं नाही नि येणं नाही
सदा म्हणतो कामात आहे
बारसं, लग्न मुंजी नको
म्हणतो मी तर बिझी आहे

दिवसेंदिवस असा कसा हा
घरात अर्धवट झोपेत असतो
बाहेर मात्र टुणटुणीत
उड्या मारत पेशंट पाहतो

आशा नाही सोडली कधी
म्हणे कुणी डोंगरे बालामृत पाज

पाजून पाजून थकले म्हणत
सुधारेल उद्या नाही तर आज

कंटाळले ग बाई या
असल्या वैद्यबुवा मुळे
सुधरण्याची वाट बघत
दगडालाही फुटतील मुळे

वटसावित्रीला करते पूजा
नाही हरकत.. हाच नवरा परत दे
घाल पदरी हा सात जन्मी
पण धंदा त्याला दुसरा दे!



२५

## ***भार्या चतुर्दशा!***

कुणी म्हणा जाया । कुणी म्हणा भार्या
उभी कर कटावरी । घेऊनी वामांगी ।। १

नाही काही कामाचा । म्हणते ती मज
सुस्त अजगर । वाटे मला ।। २

म्हणते मज ती । असशी अजागळ
तरी बळबळं । करीतो काम ।। ३

करू जातो काही । होते काहीबाही
होई अंगाची लाही । तप्त जिव्हेने ।। ४

असले नसले । कारण कसले
लीलया जिभेचा चाले । दांडपट्टा ।। ५

घरी असता ती होई । इंधन बचत
असता अशी ती । ज्वालाग्राही ।। ६

कित्येकदा तर ती । स्वयंपाक करी
तोंडाच्या वाफेवरी । ती न दवडिता ।। ७

असे कर् कशा । किंवा आवडाबाई
तिजमुळे येई । आठवण तुकयाची ।। ८

येई मुखी तिजमुळे । नाव देवाचे सदा
आठवती देवदेव ।  सदा कदा ।। ९

तितुकेच पुण्य । बांधुनिया गाठी
पुढल्या जन्मासाठी । पडे उपयोगी ।। १०

नाव तिचे घेता । फुटे असा घाम
फिरू चार धाम । लपवीत तोंड ।। ११

नाव घेण्याची असे । हिंमत कोणाची
मी तर न मुळी । असे हिकमती ।। १२

नाही मी विठ्ठल । आहे नवरा अट्टल
उभी करकटावरी । तरी रखुमाई ।। १३

लिहितो अशा । भार्या चतुर्दशा
सांगण्या ती दशा । आयुष्याची ।। १४

२६

***पती चवदसा***

म्हणे नवरा कुणी। कुणी पतीदेव
कुणी म्हणती मालक । अशा चाकरास ।। १

कोण जाणे झाले । कसे असते याचे
निभावले सारे मी । आहे म्हणूनी ।। २

माझ्याविण यास । काय तरणोपाय
असता निरूपाय । मी नसता ।। ३

बेंगरूळ म्हणा । म्हणा अजागळ
एक ना धड काम । चिंध्या भाराभार ।। ४

कर म्हटले काही । घरात मदत
वाढवितो काम उगा । लावूनिया हात ।। ५

निस्तरता पसारा । माझा वेळ जाई सारा
त्याहून बरा । हात आपुलाच ।। ६

असे असला कसला । विसराळू अती
असलाच पती । लाभला मज ।। ७

कुणी झाकुनि डोळे । त्यास पतिदेव म्हणे
दिसले देवाचे जाणे । काय गुण ।। ८

बसेल कशीही ठिम्म । चेहऱ्यावर माशी
उडवीत नाही तो । स्व हाताने ।। ९

कुणी समजावे यास । स्थितप्रज्ञता का
म्हणून का मानावे । यास दैवी ।। १०

देवा आठवली काय । अशी अवदसा
दुर्दशेची चवदसा । सांगितसे ।। ११

करीतसे नित्य । पती चवदसा पारायण
येणे मुक्ती चारी । मिळे पतिपरायणा ।। १२

दरवर्षी मी करते । लायसन्स नूतनीकरण
मनोभावे जाते शरण । वटसावित्रीस ।। १३

देई म्हणे देवा । जन्मोजन्मी हाच
करण्या मी जाच । हाच योग्य ।। १४

२७

*कसं काय पावनं..*

कसं काय पावनं बरं हाय का?
तुम्ही दचकलात हे खरं हाय का?
वाट पाहण्यात ग्येली बाई शिणून
अन्
तुम्ही काय चमकताय पावनं म्हनलं म्हणून?
नवऱ्याला पावनंच म्हनताय आमी
कारन इचारलात तर सांगतीय ना मी
म्हण्जे त्येचं काय हाय बगा
धनी आलं घरला अशे लगबगा
कारन पुसले तर काय नाय बोलतं
उन्हाळयात काळं काळं ढग आले वाटतं
लई आटवड्यानंतर वेळ कसा गावला
म्हण्जे वाटं जनू द्येवच आता पावला
बीझी असत्यात तुम्ही लई म्हण्जे लई
धनी कसलं, पाव्हनंच म्हनावं की नाई
रात रातीला असत्यात तुम्ही तिकडं
यायला फुरसत न्हाय म्हना हिकडं
टाकून येता तिकडं पत्त्यांचे आकडं
मग आज वाट चुकली कुनीकडं हिकडं
पारावर जमतो म्हनं तुमचा अड्डा

हिकडं पोटात पडतो घरच्यांच्या खड्डा
पार बसत्यात पारावर जमवून चारडोकी
गावगप्पा हानत्यात मारे छानछोकी
खेळत्यात म्हनं तास तास पत्त्याचे डाव
घराला बी येत जावा कंदी ना राव
घरची कोंबडी म्हनत्यात ना दाल बराबर
वाट पाहून थकते मी मनाला सांगत्ये सावर
आज कसे अचानक सूर्य कुटं उगवला
मग आज वखत तुमा असा कसा घावला
तरी पन आम्ही खूश समदे हाय घरचे
मालक नायतर पावनं हाय आपल्याच घरचे
पावनं म्हटलं म्हणून नका रागावू आता
रागावू नका न धनी, बसा आता कुटं जाता?



२८

## *पतिधर्माची कविता*

रात्री काल स्वप्नात पाहिले
ते आज आले सत्यात
पडले फारच महागात ते
वाटले होते मिळेल सस्त्यात..
पाहून माझ्या नशिबाला होते
वाटले उघडलेच ते आता
नसती मिळाली असली जोडी
जाऊनही समुद्रापार साता..
पाहिले होते एक स्वप्न
ज्याकरता काढल्या झोपा
आली ती सत्यामध्ये
आणि तिने डागल्या तोफा..
पहिल्यांदा ती दिसली प्रेमळ
वाटले पार लागेल नैया
लाजायची ती अशी सुंदर
म्हणत हाय रे दैया..
बदलले ग्रहमान की
झाला बदल तिच्यातच
लाजणारी तीच होती
आज मी तिच्या खिशातच..
मी पण मग बदललो की
न बदलून कुणास सांगू

पण हे समजेसमजे तोवर
लागली घरात पोरे दोन रांगू..
विचार केला नंतर मी
स्वतःच करावे लागेल काही
उघडूनी बसलो बुके सारी
मी उपाय दिसे का पाही..
प्रयत्नांती दिसे ईश्वर
तर यावर ही मिळेल उत्तर
खाजवून डोके थकलो
यात गेले दिवस सत्तर..
शेवटी झालो मी यशस्वी
सापडला मग उपाय मजला
शरणागती संपूर्ण तिजपुढे
खुश ठेवणे सदैव तिजला..
आज फिरतो बनून ज्ञानी
मारे सांगत फिरतो तत्वज्ञान
माहिती आहे स्वतःस तरी
आहे एक कोरडा पाषाण..
सांगतो साऱ्यांनाच गड्यांनो
आयुष्यात एकच ध्येय ठेवा
जाणा आपुला पतिधर्म
अन् --- तिची सेवा सुरूच ठेवा!

२९

***<u>मी होते म्हणून ..</u>***

तुला आठवतेय?
नसणारच आठवत
पण नाही बरे मी विसरली..
ऐक कान देऊन
अशी नाही देणार विसरू
भले म्हण गाडी माझी घसरली

फार नाही.. झाली असतील
वर्षे काही दहा बारा
किंवा अठरा वीस वगैरे..
आठवणीत आहेत सगळ्या गोष्टी
जणू कालच घडल्या जशा
होत्या सासूबाई काय म्हणाल्या वगैरे

तुझे काय, तू थोडेच ठेवशील ध्यानात
काय काय झालेले आपल्या लग्नात
आठवते अजूनही लख्ख..
नाही अजून विसरले तो तोरा
वरपक्ष म्हणून अगदी चोरावर मोरा
ऐक..ऐकच.. नकोस चेहरा ठेऊ मख्ख

आता माहितीय म्हणशील काय
त्याचा आता म्हणशील संबंधच काय
भूतकाळ ठेवते मी उकरून काढून..
तुला नाहीच कळणार ते
खरेतर कळूनच नाही घ्यायचे ते
ठाऊक होते भविष्यात, ठेवले काय वाढून

आठवतात अजून मला बरे अशा
कधी कशी विसरेन मी
बोललेल्या साळकाया माळकाया टोचून..
तुला काय त्याचे नाही वाटत
पण जळते ज्याचे त्यालाच कळते
मी पण दिले, दोन नाकावर टिच्चून

सोडते की काय कुणाला
आले कुणी अंगावर तर घेते शिंगावर
मी पण तशी बोलले जाणून बुजून..
तरी बसले मी गुपचूप
म्हटले आपल्याला काय करायचेय
सारे घेतले ऐकून निमूट, मी होते म्हणून

३०

## *ह्योच नवरा.. ?*

ह्योच नवरा पाहिजे म्हणून
सांगते नका करू घाई
पस्तावाल नंतर म्हणाल आणि
असला नवरा नको ग बाई

लग्नाआधी ऐकूनच घ्या
यांच्या असल्या बाता
आणतील म्हणे गुलबकावली
समुद्रापलिकडून साता

आश्वासने देतील कसले
चांदण्यांचा आणतील गजरा
आठवतात अजून मजला
रहायच्या मजवर खिळून नजरा

असले म्हणू नका पुरवायाचे
माझे सगळे ते लाड
आज म्हणे येताजाता
नाही माझ्या जिभेला हाड

विचारले मी मैतरणींना
त्यांचे नवरे ही म्हणे असलेच
बायकोचे कोडकौतुक
नाही त्यांना म्हणे कसले

सत्य म्हणे असते अकल्पित
वाटते तेच राहून राहून
स्वप्नात रंगलेले आधी
एक शिकलेय पाहून पाहून

जन्म आपला बाईचा ग बाई
यांच्या कौतुकास आपण पारखेच
कितीही घेतलीत काळजी
तरी नवरे सगळे सारखेच

३१

***आठवते ना तुला..***

आठवते ना तुला
नाही, तुला कसे आठवेल?
तू विसरणार ठाऊकचै मला
पण मी बरी विसरेन?

सासूबाई त्या दिवशी काय बोलल्या
उघडे होते बरे माझे कान
तू पडलेलास तंगड्या पसरून
मी खपत होते मोडून मान

आणि त्या तुझ्या बहिणीचा तोरा
तुला काय वाटले अशी मी विसरते
आठवतात एकेक शब्द मला सांगू?
मग म्हणतो मी कशावरही घसरते

तुला कसलाच नाही पडत फरक
तुझ्या घरची ना माणसं ती
असतील घरचे मोठे ते, म्हणतोस
मला कशाला सांग त्या उचापती

कशाला म्हणजे काय सांगू
जातेय निभावून मी आहे म्हणून
आता म्हणतोस कसा

मी काहीही काढते खणून

आता कसा बसतोस तू
घेऊन गुळणी मिठाची
पण माहितीय कसा बोलशील
झाकलीय मूठ सव्वालाखाची!

लख्ख आठवते सारे मला
मी विसरेन बरे कशी
कालच घडले वाटते सारे
मोठया शब्दांना पडले फशी

काय म्हणतोस? काही म्हणून नाही आठवत
कशाबद्दल बोलतेय तेही तुला कळत नाही?
बरोबर आहे तुझं, जळतं ज्याचं त्याला कळतं
तुला वाटणारच ते उगाचच अन्  काहीबाही

कधीचे म्हणून काय विचारतोयस
अगदी कालच्या सारखे आठवतेय मला
घडली असतील भले वर्षे वीस पंचवीस
लख्ख दिसतेय सारे सांगते मी तुला

मला माहितीय तू म्हणणार
मागचे कसले मी उगळून काढते
कां नाही काढणार, मी परत सांगते
ज्याचे जळते ना त्यालाच कळते..

३२

***सु सं स्तोत्र!***

सुखी संसाराचे स्तोत्र!

परिसावे सुसंस्तोत्र देऊनी कान । तयास सकल देती ही मान
समजावे न अक्कल गहाण । ठेविली गा ॥ १

ऐसी तू माझी दातारू । सकल संकट निवारू
तारूनिया संसार तारू । पैलतीरी नेशि गा ॥ २

मी तव आज्ञा पालकु । तूच गे माझी तारकु
तयाची एक एक झलकु । दिवसेंदिवशी गा ॥ ३

ती म्हणेल ती दिशा पूर्व । यात आनंद अपूर्व
युगे लोटली खर्व निखर्व । यात बदल नसे गा ॥ ४

समजोनी तिज वाक्य प्रमाणं । नपेक्षा भोग परिणामं
जातयेता करी प्रणामं । दो करांनी गा ॥ ५

येतजाता हलवी डोके । काळजाचे ना मोजीत ठोके
बिन झोक्याचे मिळती झोके । अन्यथा गा ॥ ६

काय जे जे तुज आकळते । ते समज तुज ना वळते
ती म्हणेल तेचि कळते । शब्द शेवटी तिचा गा ॥ ७

विवादाची न फोडे हंडी । म्हणेल त्यास हलवी मुंडी
सदा फडकवी पांढरी झंडी । तोच सुखी गा ॥ ८

प्रश्न जयाचा सर्व्हायव्हलु । न करावी बहुत वळवळु
धोरण ठेविशी गुळमुळु । ऐकशी गा ॥ ९

व्रत हे जे न करिती । धोका तयांचे प्रकृती
जेणे होईल स्वपत्नी स्वीकृती । ते ते करशी गा ॥ १०

शतकानुशतके लोक म्हणितले । या स्तोत्रे काय साधिले
पत्नीदेवीची पूजा बांधियले । तेची तगले गा ॥ ११

सुसंस्त्रोचे करती पठण । त्यास सर्व दुःख मुक्ती जाण
आनंद संसाराची खाण । असशी गा ॥ १२

नाही समजेल हे ज्या येरू । समजावे त्या असला भैरू
कोपरापासूनी नमस्कारू । करावा गा ॥ १३

बहुत सुकृताची जोडी । तद्नंतरच ही जमे जोडी
परंतु हे रहस्य कधी ना फोडी । तिजपाशी गा ॥ १४



ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. नितीन मोरे यांचे हे १८ वे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक, आपली यशस्वी श्वसनरोग तज्ञाची सेवा पार पाडत असतानाचा विरंगुळा म्हणून लिहीतात. त्यांच्या खुसखुशीत विनोदी साहित्याचे व नाटकांचे चाहते आता जगभर पसरले आहेत. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत. पण डॉ. नितीनजी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १० पुस्तके), डॉ. वृषाली जोशी (८ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४), विनीता देशपांडे (४ पुस्तके असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे

उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।